**BEFORE THE HON'BLE NATIONAL GREEN TRIBUNAL,**

**WESTERN ZONE BENCH, PUNE**

**ORIGINAL APPLICATION NO.185 OF 2023 (WZ)**

**Earlier PIL No.14/2014**

**Vanashakti Public Trust & Anr. ... Applicant**

**Union of India & Ors. ... Respondents**

**AFFIDAVIT ON BEHALF OF STATE OF MAHARASHTRA IN URBAN DEVELOPMENT DEPARTMENT (UD-2) MENTIONED AS RESPONDENT NO. 2(II)**

NOTARY
Name Bidhu Panicker
Area Wadala (E)
Maharashtra
Regn. No. 10324
Expiry Date
24.10.2028
GOVT. OF INDIA

I, Jayant Vasant Wani, Age 49 years, presently working as Under Secretary, Urban Development Department, (UD-2) Government of Maharashtra, Mantralaya, Mumbai on behalf of the Respondent No. 2, do hereby, solemnly affirm and state as under:

2. I say and submit that, I have read the contents of the Original Application I am filing this affidavit in reply on behalf of Respondent No. 2 under due authorization. I have perused the official records relating to the subject matter of this Original Application. On the basis of my personal knowledge and

official record I am filing this Affidavit in Reply in pursuant to this Original Application.

3. I say that, the present Original Application is mainly filed by the Respondents being aggrieved by the rampant encroachments and unauthorized constructions on the floodplains of rivers and tributaries, riverbeds and riparian fringes. Ultimately resulting in deterioration of water holding capacity of rives and tributaries. And also, non-compliance of the orders of Hon'ble Tribunal and failed in upholding constitutional duties of environment protection and enactment of proper River Regulation Zone Policy by the Respondent Authorities.

4. I further say that the petitioners are seeking to direct the Respondent State to take necessary remedial steps for the removal of all encroachments/ all kinds of obstructions that are denying public access to Water bodies such as Rivers, Lakes, Creeks, etc. and to restore the water bodies to their natural position.

5. I say that regarding the above issues, the Urban Development Department (2) has issued a Government Resolution dated 02.03.2009 to take measures to control and eradicate unauthorized construction/encroachment in urban areas of the State. The said Government Resolution has been issued to all the concerned Municipal Corporations, Municipal Councils, and Nagar Panchayats.

NOTARY
Name Bidhu Panicker
Area Wadala (E)
Maharashtra
Regn. No. 10324
Expiry Date
24.10.2028
GOVT. OF INDIA

Copy of the Government Resolution dated 02.03.2009 is annexed herewith and marked as Exhibit R-1.

6. Similarly, as per the Government Circular dated 03.05.2018, instructions have been issued to all the concerned Municipal Corporations, Municipal Councils, and Nagar Panchayats to take action against unauthorized constructions under the Maharashtra Regional Town Planning Act (MRTP).

Copy of the Government Circular dated 03.05.2018 is annexed herewith and marked as Exhibit R-2.

Hence, this Affidavit in Reply.

Place: Mumbai

Dated:- 08 .04.2025

J.V.W

Jayant Vasant Wani,

Under Secretary,

Urban Development Department,

Government of Maharashtra,

Mantralaya, Mumbai

**DEPONENT**

NOTARY
Name Bidhu Panicker
Area Wadala (E)
Maharashtra
Regn. No. 10324
Expiry Date
24.10.2028
GOVT. OF INDIA

## VERIFICATION

I, Jayant Vasant Wani, Age 49 years, presently working as Under Secretary, Urban Development Department, Government of Maharashtra, Mantralaya, Mumbai, do hereby solemnly affirm that whatever stated in the above mentioned paragraphs is derived from and based on official records which I believe to be true, complete and correct.

Solemnly affirmed at Mumbai )
This 8th day of April, 2025)

J. V. W.

Jayant Vasant Wani
Under Secretary,
Urban Development Department,
Government of Maharashtra,
Mantralaya, Mumbai
**DEPONENT**

BEFORE ME
BIDHU PANICKER
B.Com. LL.B.
ADVOCATE HIGH COURT
NOTARY (Govt. of India)
Res: 303, Sandeep Apt., Plot No. A/197, Sector-20, Near Balaji Temple, Nerul (W), Navi Mumbai, Maharashtra

Notary Reg. Sr. No 2005/2025
In Book No. II

- 8 APR 2025

NOTARY
Name Bidhu Panicker
Area Wadala (E)
Maharashtra
Regn. No. 10324
Expiry Date 24. 10. 2028
GOVT. OF INDIA

Identified by

(Vishal Kamble)
Section Officer
Urban Development Department

Drafted and Settled by:-

(Adv. Aniruddha Kulkarni)
National Green Tribunal (WZ), Pune.

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL

Exhibit R-1

९२९

NOTARY GOVT. OF INDIA Regn. No. 10324

**राज्यातील नागरी भागात अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलनासाठी उपाययोजना.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्र. कडोंमपा-१००६/प्र.क्र.१९२/२००६/नवि-२८**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक:- ०२ मार्च, २००९.**

**प्रस्तावना:-**

राज्यात नागरीकरण वेगाने होत असतांना, शहरांमध्ये अनधिकृत बांधका व अति क्रमणाची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असल्याचे दिसून येत आहे. यासंदर्भात शासनाने किंवा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी वेळोवेळी केलेल्या उपाययोजना पुरेशा परिणामकारक नसल्याचे अनुभवास येत असल्याने नागरी भागातील अनधिकृत बांधकाम /अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलनासाठी सर्वंकष योजना आखण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

राज्याच्या नागरी भागात अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण नियंत्रण/निर्मूलनासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना अंमलात आणण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

**(I) संरचनात्मक सुधारणा**

**(१) स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलनासाठी सर्मपित, सक्षम यंत्रणा निर्माण करणे :-**

**(अ) अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलन पथक:-**

(i) सर्व महानगरपालिकांमध्ये मुख्यालय स्तरावर तसेच प्रत्येक प्रभाग स्तरावर **अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलन पथके** निर्माण करण्यात यावीत.

मुख्यालय स्तरावरील सदर अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलन पथक उपआयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली कार्यरत राहील. तसेच प्रभाग स्तरावरील पथक सहायक आयुक्त/प्रभाग अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत राहील. या अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलन पथकांना आवश्यक कर्मचारीवृंद व यंत्रसामुग्री (उदा. ट्रक, डंपर, जे.सी.बी. इ.) उपलब्ध करुन देण्यात यावी.

जेव्हा मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण निष्कासनाची कामगिरी हाती घ्यावयाची असेल तेव्हा मुख्यालयातील पथक प्रभाग स्तरावरील पथकास मदत करेल. मुख्यालयीन पथकाचे प्रमुख असलेले उपायुक्त यांना आजूबाजूच्या प्रभागातील मनुष्यबळ व यंत्रणाही या कामासाठी जुंपण्याचे (Pooling of the machinery & manpower) अधिकार राहतील.

कृ.मा.प.

NOTARY ... GOVT. OF INDIA



(ii) नगरपालिकांमध्ये प्रभाग कार्यालये नसल्याने फक्त मुख्यालय स्तरावर मुख्याधिकारी यांच्या नियंत्रणाखाली 'अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलन पथक' निर्माण करण्यात यावे व या पथकास आवश्यक कर्मचारीवृंद व यंत्रसामुग्री (उदा. ट्रक, डंपर, जे.सी.बी. इ.) उपलब्ध करुन देण्यात यावी.

(ब) <u>नागरी पोलीसः-</u> राज्यातील महानगरपालिका / नगरपालिका कायद्यांतर्गत व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ अंतर्गत अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे इत्यादी गुन्ह्यांसाठी संबंधित महानगरपालिका / नगरपालिका स्तरावर **नागरी पोलीस यंत्रणा** उभी करण्याकरीता संबंधित महानगरपालिका / नगरपालिका यांच्याकडून नागरी पोलिसांची आवश्यक पदे त्यांच्या आस्थापनेवर निर्माण करुन अशा नागरी पोलीसांचा पूर्ण खर्च स्थायीरित्या उचलण्याची जबाबदारी स्वीकारण्यासंबंधी ठराव प्राप्त झाल्यास तेवढीच पोलीस कर्मचाऱ्यांची पदे गृह विभागांतर्गत निर्माण करण्यात येतील व त्यावर पोलीसांच्या नियुक्त्या करुन नियमित पोलीसांना **प्रतिनियुक्तीवर "नागरी पोलीस" म्हणून संबंधित महानगरपालिकेत/ नगरपालिकेत नियुक्त** करण्यात येईल. सदर नागरी पोलीसांना **मुंबई** पोलीस अधिनियम, **१९५१ मधील कलम २१ च्या** तरतुदीनुसार देखील प्राधिकृत करण्यात येईल, जेणेकरुन ते महानगरपालिका/नगरपालिका कायद्याखालील किंवा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ खालील गुन्ह्यांची दखल घेऊन त्यासंदर्भात कार्यवाही करताना नियमित पोलीसांसारखे कर्तव्यही बजावू शकतील. सदर **"नागरी पोलीस"** संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली काम करतील. त्यांचे वेतन व भत्ते, रजा/निवृत्ती अंशदान इ. संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडून अदा करण्यात येतील.

नागरी पोलीसांची पदे निर्माण करण्यासंबंधी महानगरपालिका/ नगरपालिकेकडून ठराव प्राप्त झाल्यानंतर नगर विकास विभागामार्फत आवश्यक प्रस्ताव गृह विभागाकडे सादर केला जाईल व त्यानुसार संबंधित जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक किंवा पोलीस आयुक्तांच्या आस्थापनेवर आवश्यक संख्येत पोलीसांची पदे निर्माण करणे, त्याकरीता पदनिर्मिती, पदभरती, महानगरपालिका/नगरपरिषदांमध्ये नागरी पोलीस म्हणून काम करण्यासाठी पोलीसांच्या सेवा प्रतिनियुक्तीने उपलब्ध करुन देणे इ. कार्यवाही गृह विभागाकडून करण्यात येईल.

नागरी पोलीसांना नागरी गुन्ह्यांविषयी सविस्तर माहिती व्हावी याकरीता त्यांच्यासाठी महानगरपालिका/नगरपालिका अधिनियम व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमामधील ठळक तरतूदीविषयी प्रशिक्षण सत्रे आयोजित करण्यात यावीत.

**नागरी पोलीसांची योजना महानगरपालिकांकरिता अनिवार्य व नगरपालिकांकरिता ऐच्छिक राहील.**

(२) <u>नागरी गुन्ह्यांसाठी स्वतंत्र विशेष पोलीस ठाणेः-</u>

अनधिकृत बांधकाम / अतिक्रमणासारखे नागरी गुन्हे नोंदविण्यासाठी व त्यांचा तपास करुन न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यासाठी **स्वतंत्र विशेष पोलीस ठाणे** स्थापन करण्याविषयी संबंधित महानगरपालिका यांच्याकडून त्यासंबंधी पूर्ण खर्च स्थायीरित्या उचलण्याची जबाबदारी स्वीकारण्यासंबंधी ठराव प्राप्त झाल्यास एक किंवा आवश्यकतेनुसार जास्त विशेष पोलीस ठाणी शासनाकडून संबंधित महानगरपालिका क्षेत्रात निर्माण करण्यात येतील. असे विशेष पोलीस ठाणे संबंधित शहराच्या पोलीस आयुक्त किंवा यथास्थिती संबंधित जिल्ह्याच्या पोलीस अधिक्षकाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली कार्यरत राहील. मात्र या संबंधीचा संपूर्ण आवर्ती व अनावर्ती खर्च संबंधित महानगरपालिकेकडून देय राहील. अशा स्वतंत्र विशेष पोलीस ठाण्यांसाठी येणाऱ्या संपूर्ण आवर्ती/अनावर्ती खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी महानगरपालिकांनी त्यांच्या अर्थसंकल्पात स्वतंत्र

NOTARY
Name: Bidhi Panicker
Area: Mumbai (E)
Maharashtra
Regn. No. 10324
GOVT. OF INDIA

९८७



लेखाशीर्षाखाली अर्थसंकल्पीय तरतूद करुन शासनाच्या निर्देशानुसार शासकीय तिजोरीत आवश्यक रकमेचा भरणा करणे आवश्यक राहील.

विशेष पोलीस ठाणे स्थापन करण्यासंबंधी महानगरपालिकेकडून ठराव प्राप्त झाल्यानंतर नगर विकास विभागामार्फत आवश्यक प्रस्ताव गृह विभागाकडे सादर केला जाईल व त्यानुसार संबंधित जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक किंवा पोलीस आयुक्तांच्या कार्यक्षेत्रात फक्त नागरी गुन्ह्यांसाठी विशेष पोलीस ठाणे निर्माण करणे, त्याकरीता पोलीसांची पदनिर्मिती, पदभरती इ. कार्यवाही गृह विभागाकडून करण्यांत येईल.

**(३) नागरी गुन्ह्यांसाठी स्वतंत्र न्याययंत्रणा:-**

नागरी गुन्हयांच्या न्यायप्रविष्ट प्रकरणी न्यायदानाची कार्यवाही त्वरित व्हावी यासाठी महानगरपालिकेच्या क्षेत्रात **विशेष न्यायालय** स्थापन करण्याविषयी संबंधित महानगरपालिका यांच्याकडून यासंबंधी पूर्ण खर्च स्थायीरित्या उचलण्याची जबाबदारी स्वीकारण्यासंबंधी ठराव प्राप्त झाल्यास विधी व न्याय विभागामार्फत मा.उच्च न्यायालयाच्या मंजूरीने महानगरपालिका/नगरपालिका कायद्याखालील किंवा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ खालील गुन्हयांकरिता संबंधित महानगरपालिकेच्या क्षेत्रात स्वतंत्र विशेष न्यायालय निर्माण करण्यात येईल.

अशा विशेष न्यायालयांसाठी येणाऱ्या संपूर्ण आवर्ती/अनावर्ती खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी महानगरपालिकांनी त्यांच्या अर्थसंकल्पात स्वतंत्र लेखाशीर्षाखाली अर्थसंकल्पीय तरतूद करुन शासनाच्या निर्देशानुसार शासकीय तिजोरीत आवश्यक रकमेचा भरणा करणे आवश्यक राहील.

महानगरपालिका/नगरपालिका कायद्याखालील किंवा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ खालील गुन्ह्यांसाठी स्वतंत्र विशेष न्यायालये स्थापन करण्याबाबत महानगरपालिकेकडून ठराव प्राप्त झाल्यानंतर नगर विकास विभागामार्फत आवश्यक प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे सादर केला जाईल व मा.उच्च न्यायालयाच्या मान्यतेने पुढील कार्यवाही विधी व न्याय विभागाकडून करण्यात येईल.

विशेष पोलीस ठाणे व विशेष न्यायालयांची स्थापना करण्यासाठी ठराव करुन नगरपालिकांनी देखील मागणी केल्यास व खर्चाची स्थायीरित्या जबाबदारी स्वीकारल्यास त्यांच्यासाठीही विशेष पोलीस ठाणे व विशेष न्यायालये भविष्यकाळात निर्माण करण्यात येतील.

**वरीलप्रमाणे नागरी पोलीस, विशेष पोलीस स्टेशन व विशेष न्यायालये अशी सर्व यंत्रणा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने ,ठराव करुन मागणी केल्यास व खर्चाची जबाबदारी स्थायीरित्या स्वीकारल्यास, निर्माण करण्यात येणार असल्याने यासाठी आस्थापना खर्चाची विहीत करण्यात आलेली मर्यादा शिथील करण्यात येईल.**

**(II) क्षेत्रीय पातळीवर अनधिकृत बांधकाम/अतिक्रमणासंदर्भात करावयाच्या कार्यवाहीबिषयी जबाबदारी आणि कार्यपद्धती यांची सुस्पष्ट मांडणी :-**

महानगरपालिका/नगरपालिका क्षेत्रात होणारे अतिक्रमण व अनधिकृत बांधकामास आळा घालण्याच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे कार्यपद्धती व जबाबदारी विहित करण्यात येत आहे :-

१) महानगरपालिकेअंतर्गत प्रत्येक प्रभागात होणाऱ्या अतिक्रमण व अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करण्याची व्यक्तिशः जबाबदारी संबंधित सहायक आयुक्त/प्रभाग अधिकारी यांची राहील. नगरपरिषदेमध्ये अतिक्रमण व अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करण्याची व्यक्तिशः जबाबदारी मुख्याधिकारी यांची राहील.

NOTARY
Name: Bidhu Panicker
Area: Wadala (E)
Maharashtra
Regn. No. 10324
GOVT. OF INDIA



२) (अ) या कामासाठी संबंधित सहायक आयुक्त/प्रभाग अधिकारी यांनी महानगरपालिका आयुक्तांच्या मान्यतेने त्यांच्या प्रभागाची त्याचप्रमाणे मुख्याधिकाऱ्यांनी शहराची **बिटनिहाय विभागणी** करुन प्रत्येक बीटमध्ये सुयोग्य कर्मचाऱ्याची बीट निरिक्षक व बीट मुकादम म्हणून नियुक्ती करावी. कोणत्याही बीटमध्ये अनधिकृत बांधकाम, अतिक्रमण, अनधिकृत फेरीवाले इ. नागरी गुन्हे घडू नयेत, यादृष्टीने संबंधित बीट निरिक्षक व बीट मुकादम यांच्याकडे गस्त घालण्याचे काम सोपविण्यात यावे. त्याकरीता शक्य असल्यास त्यांना मोटर सायकल तसेच डिजिटल कॅमेरे उपलब्ध करुन द्यावे. बीट निरीक्षकाने बीटमध्ये चालू असलेल्या बांधकाम परवानगीचे कागदपत्र, होर्डिंग्ज लावण्यासाठी परवानगी, फेरीवाला अनुज्ञप्ती किंवा नोंदणीपत्र इ. ची तपासणी करुन आवश्यक परवानगी नसेल अशी प्रकरणे संबंधित प्रभाग अधिकाऱ्याच्या किंवा यथास्थिती मुख्याधिकाऱ्याच्या लेखी निदर्शनास आणावीत. प्रभाग अधिकाऱ्याने किंवा यथास्थिती मुख्याधिकाऱ्याने उपलब्ध अभिलेखांची तपासणी करुन जर ते समाधानकारक आढळले नाहीत तर नियमानुसार संबंधितांना नोटीस द्यावी व संबंधित व्यक्ती नोटीस कालावधीत आवश्यक कागदपत्रे सादर करु न शकल्यास त्या गुन्ह्याबाबत पुढील आवश्यक कारवाई (निष्कासन, एफ.आय.आर. दाखल करणे इ.) नियमानुसार करावी.

(ब) महानगरपालिकेत प्रभाग स्तरावर व नगरपालिकेत मुख्यालय स्तरावर बीटनिहाय नोंदवही ठेवण्यात यावी आणि बीट निरिक्षक/मुकादम यांनी या नोंदवहीमध्ये त्यांच्या बीटमधील अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम इ. नागरी गुन्ह्याशी संबंधीत घटनांची नोंद घ्यावी. तसे न केल्यास संबंधित बीट निरिक्षकास जबाबदार धरण्यात यावे. तसेच बीटमध्ये अतिक्रमण/अनधिकृत बांधकामाची एकही घटना निदर्शनास न आल्यास त्याचीही सुस्पष्ट नोंद बीट रजिस्टरमध्ये करण्याची जबाबादारी बीट निरिक्षक/बीट मुकादमाची राहील.

(क) बीट निरिक्षक व बीट मुकादम यांनी बीट नोंदवहीत नोंद केल्यानंतर संबंधीत घटनेची शहानिशा करण्यासाठी प्रभाग अधिकाऱ्यांनी किंवा यथास्थिती मुख्याधिकाऱ्यांनी एका अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. सदर अधिकाऱ्यांनी त्याचा अहवाल प्रभाग अधिकाऱ्यांना किंवा यथास्थिती मुख्याधिकाऱ्यांना अविलंब सादर करावा व प्रभाग अधिकारी/मुख्याधिकारी यांनी त्याआधारे नियमानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

(ड) महानगरपालिकांच्या बाबतीत प्रभाग स्तरावरील सहायक आयुक्त/प्रभाग अधिकारी यांच्या नियंत्रणाखालील पथकाने अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण निर्मूलनाबाबत प्रभाग स्तरावर करण्यात आलेल्या निष्कासन कारवाईचा दैनंदिन अहवाल अतिरिक्त/उपआयुक्त (मुख्यालय)(अनधिकृत बांधकाम विभाग) यांच्याकडे सादर करावा. अतिरिक्त/उपआयुक्त (मुख्यालय) यांनी शहरात करण्यात आलेल्या कारवाईचा दैनंदिन आढावा घेऊन तो आयुक्तांना सादर करावा.

(इ) नगरपरिषदांमधील अतिक्रमण निर्मूलन व अनधिकृत बांधकाम नियंत्रण पथकाने शहरातील अनधिकृत बांधकाम/अतिक्रमणासंदर्भात केलेल्या कारवाईचा दैनंदिन आढावा मुख्याधिकाऱ्यांनी घ्यावा.

३) अनधिकृत बांधकामावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलन पथक व महानगरपालिकेचा/नगरपालिकेचा नगररचना विभाग यांच्यात अधिक समन्वयाची आवश्यकता असल्याने त्याकरीता आयुक्तांनी/मुख्याधिकाऱ्यांनी आवश्यक उपाययोजना कराव्यात. एखाद्या नियोजन प्राधिकरणाच्या नगररचना विभागाने एखाद्या बांधकामास बांधकाम परवानगी दिल्यानंतर त्यांची माहिती क्षेत्रीय अधिकाऱ्यांना/बीट कर्मचाऱ्यांना त्वरीत देण्यात येईल, अशी व्यवस्था करण्यात येईल.

NOTARY
GOVT. OF INDIA

९०२



४) महानगरपालिका/नगरपालिका क्षेत्रात सुरु असलेली सर्व नविन बांधकामे मंजूर आराखड्यानुसारच होत आहेत किंवा कसे यांची पहाणी प्रभाग स्तरावरील किंवा यथास्थिती मुख्यालय स्तरावरील पथकाने नियमितरित्या करावी व मंजूर आराखड्याशिवाय बांधकाम सुरु असल्याचे आढळल्यास नियमानुसार कारवाई करावी.

५) आपापल्या कार्यक्षेत्रामध्ये निदर्शनास आलेल्या/आणण्यात आलेल्या अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम/अनधिकृत फेरीवाले/अनधिकृत जाहिरात फलक इत्यादी नागरी गुन्ह्यांबाबत विहित मुदतीत नोटीस न दिल्यास व पुढील कारवाई न केल्यास संबंधित अधिकाऱ्यास/कर्मचाऱ्यास व्यक्तिशः जबाबदार धरुन त्याच्या विरुद्ध कारवाई करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

६) प्रभाग अधिकाऱ्याने किंवा यथास्थिती मुख्याधिकाऱ्याने दिलेल्या नोटीशीस त्यांच्या सक्षम वरिष्ठ प्राधिकाऱ्यांनी किंवा न्यायालयाने स्थगिती दिली नसल्यास विहित मुदतीनंतर नोटीशीप्रमाणे पुढील कारवाई निश्चितपणे करणे आवश्यक राहील. [illegible] न केल्यास संबंधितांना व्यक्तिशः जबाबदार धरुन त्यांच्या विरुद्ध कारवाई करण्यात येईल, याचीही सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(मनु कुमार श्रीवास्तव)
सचिव (२), नगर विकास विभाग

प्रति,
१) मा.मुख्य सचिव,
२) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) आयुक्त, सर्व महानगरपालिका.
७) संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
८) मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषदा.
९) नगर विकास विभागातील सर्व सह सचिव/उप सचिव
१०) नगर विकास विभागातील सर्व कार्यासने.
११) निवडनस्ती.

---

एच-०१६३[६००-६-२००१]-३[२]

NOTARY GOVT. OF INDIA Regn. No. 10324

महाराष्ट्र शासन

क्रमांकः- कडोंमपा-१००६/प्र.क्र.१९२/२००६/नवि-२८
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांकः- ०२/०३/२००९.

प्रति,

१) आयुक्त,
सर्व महानगरपालिका.

२) संचालक,
नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.

**विषयः-** राज्यातील नागरी भागातील अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्र व निर्मूलनासाठी उपाययोजना.

**संदर्भः-** शासन निर्णय क्र.कडोंमपा-१००६/प्र.क्र.१९२/२००६/नवि-२८, दि.२ मार्च, २००९.

महोदय,

राज्यातील नागरी भागातील अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलनासाठी विविध उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याबाबत संदर्भाधीन शासन निर्णयान्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

०२. त्यानुसार नागरी पोलीसांची योजना महानगरपालिकांकरिता अनिवार्य व नगरपालिकांकरिता ऐच्छिक करण्यत आली आहे नागरी पोलीस यंत्रणा उभी करण्यासाठी संबंधित महानगरपालिका/नगरपालिकांकडून स्थायीरित्या पूर्ण खर्च उचलण्याची जबाबदारी स्विकारण्यासंबंधी ठराव नगर विकास विभागाकडे प्राप्त झाल्यानंतर आवश्यक ती पदे निर्माण करण्यासाठी प्रस्ताव गृह विभागाकडे सादर केला जाईल. तसेच विशेष पोलीस ठाणे स्थापन करण्यासंबंधी महानगरपालिकेकडून ठराव प्राप्त झाल्यानंतर नगर विकास विभागामार्फत आवश्यक प्रस्ताव गृह विभागाकडे सादर करण्यात येईल.

०३. विशेष न्यायालये स्थापन करण्यासाठी संबंधित महानगरपालिका/नगरपालिकांकडून स्थायीरित्या पूर्ण खर्च उचलण्याची जबाबदारी स्विकारण्यासंबंधी ठराव नगर विकास विभागाकडे प्राप्त झाल्यानंतर मा.उच्च न्यायालयाच्या मान्यतेने विशेष न्यायालय स्थापन करण्यासाठी पुढील कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे सादर केला जाईल.

नागरी पोलीस, विशेष पोलीस ठाणे व विशेष न्यायालयांसाठी प्रस्ताव तयार करताना विविध वर्गांच्या महानगरपालिका/नगरपालिका (विवरणपत्र - अ, ब, क) मध्ये दर्शविलेल्या संभाव्य आकृतीबंधाचा विचार करु शकतील.

आपला,

सही /-
( संजू क. गुप्ते )
**कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग**

२०९

NOTARY
Name: Bidhu Panicker
Area: Wadala (E) Maharashtra
Regn. No. 10324
GOVT. OF INDIA



## परिशिष्ट अ

**अतिक्रमण निर्मूलन व अनधिकृत बांधकाम नियंत्रण इ.साठी महानगरपालिका/नगरपालिका स्तरावर प्रस्तावित नागरी पोलीस यंत्रणेसाठी आकृतीबंध**

| | | | महानगरपालिका | | | | नगरपालिका | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी (असुधारित) | अ | ब | क | ड | अ | ब | क |
| १ | अतिरिक्त पोलीस आयुक्त | १६४००-४५०-२०००० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २ | पोलीस उपायुक्त/अतिरिक्त पोलीस अधिक्षक | १००००-३२५-१५२०० | १ | १ | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | सहा.पोलीस आयुक्त/ पोलीस उपअधिक्षक | ८०००-२७५-१३५०० | ३ | २ | १ | १ | ० | ० | ० |
| ४ | पोलीस निरीक्षक | ७४५०-२२५-११५०० | ३ | ३ | १ | १ | १ | ० | ० |
| ५ | सहा. पोलीस निरिक्षक | ६५००-२००-१०५०० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ |
| ६ | पोलीस उपनिरिक्षक | ५५००-१७५-९००० | ६० | १० | ६ | ४ | २ | १ | १ |
| ७ | सहा.पोलीस उपनिरीक्षक | ४५००-१२५-७००० | १६ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ८ | पोलीस हवालदार | ४०००-१००-६००० | १५० | १० | ६ | ४ | २ | १ | १ |
| ९ | सशस्त्र पोलीस शिपाई | ३०५०-७५-४५९० | ३९० | ६० | ३६ | २४ | १२ | ६ | ६ |
| १० | महिला पोलीस शिपाई | ३०५०-७५-४५९० | ३९० | ४० | २४ | १६ | ८ | ४ | ४ |
| ११ | पोलीस नाईक / वाहन चालक | ४०००-१००-६००० | १० | ६ | ४ | ३ | २ | १ | १ |
| | एकूण पदे | | १,१०४ | १३२ | ७८ | ५३ | २९ | १४ | १४ |

NOTARY OF INDIA

पक्ष-०६९३[क्री]-९३

## परिशिष्ट - ब

### नागरी गुन्हयाच्या नोंदणी , तपास व खटला भरण्यकामी स्थापन करावयाच्या विशेष पोलीस स्टेशन यांचे आकृतीबंध

#### पोलीस स्टेशन - नमुना - १ (अ/ब/क वर्ग महानगरपालिका क्षेत्रासाठी)

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी (असुधारित) | पद संख्या |
|---|---|---|---|
| १ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | ६५००-२००-१०५०० | १ |
| २ | पोलीस उप निरीक्षक | ५५००-१७५-९००० | १ |
| ३ | सहाय्यक पोलीस उप निरीक्षक | ४५००-१२५-७००० | २ |
| ४ | पोलीस हवालदार (सशस्त्र) | ४०००-१००-६००० | ६ |
| ५ | पोलीस शिपाई (सशस्त्र) | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | १४ |
| ६ | कनिष्ठ लिपिक | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | २ |
| ७ | वाहन चालक | ४०००-१००-६००० | २ |
| | | एकूण | २८ |

#### पोलीस स्टेशन - नमुना - २ (ड वर्ग महानगरपालिका क्षेत्रासाठी)

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी (असुधारित) | पद संख्या |
|---|---|---|---|
| १ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | ६५००-२००-१०५०० | १ |
| २ | पोलीस उप निरीक्षक | ५५००-१७५-९००० | १ |
| ३ | सहाय्यक पोलीस उप निरीक्षक | ४५००-१२५-७००० | १ |
| ४ | पोलीस हवालदार (सशस्त्र) | ४०००-१००-६००० | ४ |
| ५ | पोलीस शिपाई (सशस्त्र) | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | ८ |
| ६ | कनिष्ठ लिपिक | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | १ |
| ७ | वाहन चालक | ४०००-१००-६००० | १ |
| | | एकूण | १७ |

पव-०९६३[बी][६००-३-२००१]-३.

## परिशिष्ट - क

### नागरी गुन्ह्यांसाठी स्थापन करावयाचे विशेष न्यायालय

#### विशेष न्यायालये - नमुना - १ (अ/ब/क वर्ग महानगरपालिका क्षेत्रासाठी)

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | वेतनश्रेणी (असुधारित) |
|---|---|---|---|
| १ | अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधिश | १ | १६७५०-४००-१९१५०-४५०-२०५०० |
| २ | अधिक्षक | १ | ५५००-१७५-९००० |
| ३ | लघुलेखक (उच्च श्रेणी) | १ | ६५००-२००-१०५०० |
| ४ | वरिष्ठ लिपीक | ४ | ४०००-१००-६००० |
| ५ | कनिष्ठ लिपीक | ९ | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ६ | बेलिफ | ३ | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ७ | पुस्तक बांधणीकार | १ | २७५०-७०-३८००-७५-४४०० |
| ८ | शिपाई | २ | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| ९ | पहारेकरी | १ | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| १० | सफाई कामगार | १ | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| ११ | वाहन चालक (New item) | १ | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| | एकूण | २५ | |

#### न्यायालये - नमुना - २ (ड वर्ग महानगरपालिका क्षेत्रासाठी)

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | वेतनश्रेणी (असुधारित) |
|---|---|---|---|
| १ | सह दिवाणी व फौजदारी न्यायाधीश (व.स्त.) | १ | १२८५०-३००-१३१५०-४००-१७५५० |
| २ | सहाय्यक अधिक्षक | १ | ५०००-१५०-८००० |
| ३ | लघुलेखक (नि.श्रे) | १ | ५५००-१७५-९००० |
| ४ | वरिष्ठ लिपीक | १ | ४०००-१००-६००० |
| ५ | कनिष्ठ लिपीक | २ | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ६ | बेलिफ | १ | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ७ | शिपाई | २ | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| | एकूण | ९ | |

------------



NOTARY
Name: Bidhu Panickar
Maharashtra
Regn. No. 10324
GOVT. OF INDIA

Exhibit R-2

NOTARY GOVT. OF INDIA

२०७

महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम (MRTP) कायद्यांर्गत अनधिकृत बांधकामांविरुध्द कारवाई करणेबाबत..

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
**शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.५१०/ नवि-२०**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ३ मे, २०१८.

वाचा:- शासन निर्णय क्र.कडोंमपा-१००६/प्र.क्र.१९२/२००६, नवि-२६, दिनांक ०२ मार्च, २००९.

**शासन परिपत्रक:-**

राज्यातील नागरी क्षेत्रात अनधिकृत इमारती बांधकामाची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असल्याचे दिसते. विकासकाकडून नियमबाह्य / पुरेश्या परवानग्या प्राप्त न करताच बांधकाम करण्यात येते व तद्नंतर अशा सदनिका, मालमत्ता विक्री करण्यात येतात अशा व्यवहाराची नोंदणी संबंधित दुय्यम निबंधक यांचेकडे करण्यात येते. परंतु, जेंव्हा उक्त बांधकाम अनधिकृत असल्याचे लक्षात येते, तेव्हा नागरी स्थानिक स्वराज्य संस्था / नियोजन प्राधिकरणाकडून निष्कासनाची कार्यवाही करण्यात आल्यास निष्पाप गाळेधारक किंवा सदनिका धारक यांना निष्कासनाच्या कार्यवाहीला सामोरे जावे लागते. वास्तविक बहुतांश गाळे धारक व सदनिका धारकांची ते राहत असलेली इमारत अनधिकृत असल्याची माहिती नसते. यामुळे गाळेधारक व सदनिका धारकांची फसवणूक होते. या बाबी टाळण्यासाठी संदर्भिय शासन निर्णय दिनांक ०२ मार्च, २००९ अन्वये सूचना दिलेल्या आहेत.

२. वरील बाबी टाळण्याच्या दृष्टिने सुस्पष्ट सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. महाराष्ट्रातील नगर विकास विभागांतर्गत सर्व नियोजन प्राधिकरणांनी महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, १९६६ कायद्यांर्गत अनधिकृत बांधकामांविरुध्द कारवाई करणेबाबत यापुर्वी देण्यात आलेल्या सूचनांबरोबरच खालील कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

१. अनधिकृत बांधकामांबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६०,२६७ व २६७ (अ) तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५२, ५३ व ५४ तसेच इतर अनुषंगिक कलमांनुसार कारवाई करण्यात यावी.

२. सर्व संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्था / नियोजन प्राधिकरणे यांनी प्रभागनिहाय अधिकृत व अनधिकृत बांधकामाची यादी सर्वे नं. व विकासकांच्या नावासह स्वतंत्ररित्या त्यांच्या संकेतस्थळावर तसेच वर्तमानपत्रात प्रसिध्द करावी.

३. बांधकाम निष्कासीत करण्याची नोटीस देतानांच महानगरपालिकेने संबंधित दिवाणी न्यायालयामध्ये Caveat दाखल करण्याच्या सूचना द्याव्यात, जेणेकरुन संबंधित न्यायालयाचा Ex-Parte स्थगिती आदेश देता येणार नाही.

NOTARY
Name: Bithu Panicker
Area: Wadala (E) Maharashtra
Regn. No. 10324
GOVT. OF INDIA



४. त्या त्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्था / नियोजन प्राधिकरण क्षेत्रातील अनधिकृत इमारतींची / बांधकामाची यादी संबंधित दुय्यम निबंधकाकडे सादर करुन, त्यांना सदर इमारतीतील सदनिकांबाबत खरेदी व्यवहार नोंदवू नयेत अशा सूचना संबंधित नियोजन प्राधिकरणांनी द्याव्यात.

५. ज्या प्रकरणांमध्ये स्थगिती आदेश आहेत अशा प्रकरणांमध्ये संबंधित न्यायालयांना इमारत अनधिकृत असणे, यामुळे ग्राहकांची फसवणूक होणे, या बाबी निदर्शनास आणून स्थगिती उठविण्याकरीता न्यायालयास विनंती करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत त्यानुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी सर्व संबंधित अधिकारी / कर्मचारी यांची राहील.

६. ज्या पदनिर्देशित अधिकाऱ्यांच्या क्षेत्रात अनधिकृत बांधकामे आहेत, अशा अधिकाऱ्यांवर दिनांक ०२.०३.२००९ च्या शासन निर्णयातील सूचनांनुसार कारवाई करण्यात यावी.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०५०४१४२४१२९९२५ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by Shankar Trambak Jadhav
Date: 2018.05.04 14:28:12 +05'30'

(शंकर जाधव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. सभापती, महाराष्ट्र विधान परिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
३) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधान सभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
४) मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) प्रधान सचिव-१/२ नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६) आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई.
७) व्यवस्थापकीय संचालक, सिडको, नवी मुंबई.
८) आयुक्त, सर्व महानगरपालिका
९) विभागीय आयुक्त, प्रशासकीय विभाग, सर्व.
१०) मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रादेशिक विकास यंत्रणा, पुणे.
११) आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
१२) सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.
१३) मुख्याधिकारी, नगरपरिषदा / नगर पंचायत सर्व.

**राज्यातील नागरी भागात**
**अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण**
**नियंत्रण व निर्मूलनासाठी उपाययोजना.**

**महाराष्ट्र शासन**
नगर विकास विभाग
**शासन निर्णय क्र. कर्डोमपा-१००६/प्र.क्र.१९२/२००६/नवि-२८**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
दिनांकः- ०२ मार्च, २००९.

**प्रस्तावनाः-**

राज्यात नागरीकरण वेगाने होत असतांना, शहरांमध्ये अनधिकृत बांधकाम व अतिक्रमणाची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असल्याचे दिसून येत आहे. यासंदर्भात शासनाने किंवा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनीं वेळोवेळी केलेल्या उपाययोजना पुरेशा परिणामकारक नसल्याचे अनुभवास येत असल्याने नागरी भागातील अनधिकृत बांधकाम /अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलनासाठी सर्वंकष योजना आखण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

राज्याच्या नागरी भागात अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण नियंत्रण/निर्मूलनासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना अंमलात आणण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

**(I) संरचनात्मक सुधारणा**

**(१) स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलनासाठी समर्पित, सक्षम यंत्रणा निर्माण करणे :-**

**(अ) अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलन पथकः-**

(i) सर्व महानगरपालिकांमध्ये मुख्यालय स्तरावर तसेच प्रत्येक प्रभाग स्तरावर **अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलन पथके** निर्माण करण्यात यावीत.

मुख्यालय स्तरावरील सदर अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलन पथक उपआयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली कार्यरत राहील. तसेच प्रभाग स्तरावरील पथक सहायक आयुक्त/प्रभाग अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत राहील. या अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलन पथकांना आवश्यक कर्मचारीवृंद व यंत्रसामुग्री (उदा. ट्रक, डंपर, जे.सी.बी. इ.) उपलब्ध करुन देण्यात यावी.

जेव्हा मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण निष्कासनाची कामगिरी हाती घ्यावयाची असेल तेव्हा मुख्यालयातील पथक प्रभाग स्तरावरील पथकास मदत करेल. मुख्यालयीन पथकाचे प्रमुख असलेले उपायुक्त यांना आजूबाजूच्या प्रभागातील मनुष्यबळ व यंत्रणाही या कामासाठी जुंपण्याचे (Pooling of the machinery & manpower) अधिकार राहतील.

कृ.मा.प.

(II) नगरपालिकांमध्ये प्रभाग कार्यालये नसल्याने फक्त मुख्यालय स्तरावर मुख्याधिकारी यांच्या नियंत्रणाखाली 'अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलन पथक' निर्माण करण्यात यावे व या पथकास आवश्यक कर्मचारीवृंद व यंत्रसामुग्री (उदा. ट्रक, डंपर, जे.सी.बी. इ.) उपलब्ध करुन देण्यात यावी.

**(ब) <u>नागरी पोलीसः-</u>** राज्यातील महानगरपालिका / नगरपालिका कायद्यांतर्गत व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ अंतर्गत अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे इत्यादी गुन्हयांसाठी संबंधित महानगरपालिका / नगरपालिका स्तरावर **नागरी पोलीस यंत्रणा** उभी करण्याकरीता संबंधित महानगरपालिका / नगरपालिका यांच्याकडून नागरी पोलिसांची आवश्यक पदे त्यांच्या आस्थापनेवर निर्माण करुन अशा नागरी पोलीसांचा पूर्ण खर्च स्थायीरित्या उचलण्याची जबाबदारी स्वीकारण्यासंबंधी ठराव प्राप्त झाल्यास तेवढीच पोलीस कर्मचाऱ्यांची पदे गृह विभागांतर्गत निर्माण करण्यात येतील व त्यावर पोलीसांच्या नियुक्त्या करुन नियमित पोलीसांना **प्रतिनियुक्तीवर "नागरी पोलीस" म्हणून संबंधित** महानगरपालिकेत/ नगरपालिकेत **नियुक्त** करण्यात येईल. सदर नागरी पोलीसांना **मुंबई** पोलीस अधिनियम, **१९५१ मधील कलम २१ च्या** तरतुदीनुसार देखील **प्राधिकृत करण्यात येईल,** जेणेकरुन ते महानगरपालिका/नगरपालिका कायद्याखालील किंवा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ खालील गुन्हयांची दखल घेऊन त्यासंदर्भात कार्यवाही करताना नियमित पोलीसांसारखे कर्तव्यही बजावू शकतील. सदर **"नागरी पोलीस"** संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली काम करतील. त्यांचे वेतन व भत्ते, रजा/निवृत्ती अंशदान इ. संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडून अदा करण्यात येतील.

नागरी पोलीसांची पदे निर्माण करण्यासंबंधी महानगरपालिका/ नगरपालिकेकडून ठराव प्राप्त झाल्यानंतर नगर विकास विभागामार्फत आवश्यक प्रस्ताव गृह विभागाकडे सादर केला जाईल व त्यानुसार संबंधित जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक किंवा पोलीस आयुक्तांच्या आस्थापनेवर आवश्यक संख्येत पोलीसांची पदे निर्माण करणे, त्याकरीता पदनिर्मिती, पदभरती, महानगरपालिका/नगरपरिषदांमध्ये नागरी पोलीस म्हणून काम करण्यासाठी पोलीसांच्या सेवा प्रतिनियुक्तीने उपलब्ध करुन देणे इ. कार्यवाही गृह विभागाकडून करण्यात येईल.

नागरी पोलीसांना नागरी गुन्ह्यांविषयी सविस्तर माहिती व्हावी याकरीता त्यांच्यासाठी महानगरपालिका/नगरपालिका अधिनियम व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमामधील ठळक तरतूदीविषयी प्रशिक्षण सत्रे आयोजित करण्यात यावीत.

**नागरी पोलीसांची योजना महानगरपालिकांकरिता अनिवार्य व नगरपालिकांकरिता ऐच्छिक राहील.**

**(२) <u>नागरी गुन्ह्यांसाठी स्वतंत्र विशेष पोलीस ठाणेः-</u>**

अनधिकृत बांधकाम / अतिक्रमणासारखे नागरी गुन्हे नोंदविण्यासाठी व त्यांचा तपास करुन न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यासाठी **स्वतंत्र विशेष पोलीस ठाणे** स्थापन करण्याविषयी संबंधित महानगरपालिका यांच्याकडून त्यासंबंधी पूर्ण खर्च स्थायीरित्या उचलण्याची जबाबदारी स्वीकारण्यासंबंधी ठराव प्राप्त झाल्यास एक किंवा आवश्यकतेनुसार जास्त विशेष पोलीस ठाणी शासनाकडून संबंधित महानगरपालिका क्षेत्रात निर्माण करण्यात येतील. असे विशेष पोलीस ठाणे संबंधित शहराच्या पोलीस आयुक्त किंवा यथास्थिती संबंधित जिल्ह्याच्या पोलीस अधिक्षकाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली कार्यरत राहील. मात्र या संबंधीचा संपूर्ण आवर्ती व अनावर्ती खर्च संबंधित महानगरपालिकेकडून देय राहील. अशा स्वतंत्र विशेष पोलीस ठाण्यांसाठी येणाऱ्या संपूर्ण आवर्ती/अनावर्ती खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी महानगरपालिकांनी त्यांच्या अर्थसंकल्पात स्वतंत्र

लेखाशीर्षाखाली अर्थसंकल्पीय तरतूद करुन शासनाच्या निर्देशानुसार शासकीय तिजोरीत आवश्यक रकमेचा भरणा करणे आवश्यक राहील.

विशेष पोलीस ठाणे स्थापन करण्यासंबंधी महानगरपालिकेकडून ठराव प्राप्त झाल्यानंतर नगर विकास विभागामार्फत आवश्यक प्रस्ताव गृह विभागाकडे सादर केला जाईल व त्यानुसार संबंधित जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक किंवा पोलीस आयुक्तांच्या कार्यक्षेत्रात फक्त नागरी गुन्ह्यांसाठी विशेष पोलीस ठाणे निर्माण करणे, त्याकरीता पोलीसांची पदनिर्मिती, पदभरती इ. कार्यवाही गृह विभागाकडून करण्यात येईल.

(३) नागरी गुन्ह्यांसाठी स्वतंत्र न्याययंत्रणा:-

नागरी गुन्हयांच्या न्यायप्रविष्ट प्रकरणी न्यायदानाची कार्यवाही त्वरित व्हावी यासाठी महानगरपालिकेच्या क्षेत्रात विशेष न्यायालय स्थापन करण्याविषयी संबंधित महानगरपालिका यांच्याकडून यासंबंधी पूर्ण खर्च स्थायीरित्या उचलण्याची जबाबदारी स्वीकारण्यासंबंधी ठराव प्राप्त झाल्यास विधी व न्याय विभागामार्फत मा.उच्च न्यायालयाच्या मंजूरीने महानगरपालिका/ नगरपालिका कायद्याखालील किंवा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ खालील गुन्हयांकरिता संबंधित महानगरपालिकेच्या क्षेत्रात स्वतंत्र विशेष न्यायालय निर्माण करण्यात येईल.

अशा विशेष न्यायालयांसाठी येणाऱ्या संपूर्ण आवर्ती/अनावर्ती खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी महानगरपालिकांनी त्यांच्या अर्थसंकल्पात स्वतंत्र लेखाशीर्षाखाली अर्थसंकल्पीय तरतूद करुन शासनाच्या निर्देशानुसार शासकीय तिजोरीत आवश्यक रकमेचा भरणा करणे आवश्यक राहील.

महानगरपालिका/नगरपालिका कायद्याखालील किंवा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ खालील गुन्ह्यांसाठी स्वतंत्र विशेष न्यायालये स्थापन करण्याबाबत महानगरपालिकेकडून ठराव प्राप्त झाल्यानंतर नगर विकास विभागामार्फत आवश्यक प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे सादर केला जाईल व मा.उच्च न्यायालयाच्या मान्यतेने पुढील कार्यवाही विधी व न्याय विभागाकडून करण्यात येईल.

विशेष पोलीस ठाणे व विशेष न्यायालयांची स्थापना करण्यासाठी ठराव करुन नगरपालिकांनी देखील मागणी केल्यास व खर्चाची स्थायीरित्या जबाबदारी स्वीकारल्यास त्यांच्यासाठीही विशेष पोलीस ठाणे व विशेष न्यायालये भविष्यकाळात निर्माण करण्यात येतील.

**वरीलप्रमाणे नागरी पोलीस, विशेष पोलीस स्टेशन व विशेष न्यायालये अशी सर्व यंत्रणा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने ठराव करुन मागणी केल्यास व खर्चाची जबाबदारी स्थायीरित्या स्वीकारल्यास, निर्माण करण्यात येणार असल्याने यासाठी आस्थापना खर्चाची विहीत करण्यात आलेली मर्यादा शिथील करण्यात येईल.**

(II) क्षेत्रीय पातळीवर अनधिकृत बांधकाम/अतिक्रमणासंदर्भात करावयाच्या कार्यवाहीविषयी जबाबदारी आणि कार्यपद्धती यांची सुस्पष्ट मांडणी :-

महानगरपालिका/नगरपालिका क्षेत्रात होणारे अतिक्रमण व अनधिकृत बांधकामास आळा घालण्याच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे कार्यपद्धती व जबाबदारी विहित करण्यात येत आहे :-

१) महानगरपालिकेअंतर्गत प्रत्येक प्रभागात होणाऱ्या अतिक्रमण व अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करण्याची व्यक्तिशः जबाबदारी संबंधित सहायक आयुक्त/प्रभाग अधिकारी यांची राहील. नगरपरिषदेमध्ये अतिक्रमण व अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करण्याची व्यक्तिशः जबाबदारी मुख्याधिकारी यांची राहील.

२) (अ) या कामासाठी संबंधित सहायक आयुक्त/प्रभाग अधिकारी यांनी महानगरपालिका आयुक्तांच्या मान्यतेने त्यांच्या प्रभागाची त्याचप्रमाणे मुख्याधिकाऱ्यांनी शहराची **बिटनिहाय विभागणी** करुन प्रत्येक बीटमध्ये सुयोग्य कर्मचाऱ्याची बीट निरिक्षक व बीट मुकादम म्हणून नियुक्ती करावी. कोणत्याही बीटमध्ये अनधिकृत बांधकाम, अतिक्रमण, अनधिकृत फेरीवाले इ. नागरी गुन्हे घडू नयेत, यादृष्टीने संबंधित बीट निरिक्षक व बीट मुकादम यांच्याकडे गस्त घालण्याचे काम सोपविण्यात यावे. त्याकरीता शक्य असल्यास त्यांना मोटर सायकल तसेच डिजिटल कॅमेरे उपलब्ध करुन द्यावे. बीट निरीक्षकाने बीटमध्ये चालू असलेल्या बांधकाम परवानगीचे कागदपत्र, होर्डिंग्ज लावण्यासाठी परवानगी, फेरीवाला अनुज्ञप्ती किंवा नोंदणीपत्र इ. ची तपासणी करुन आवश्यक परवानगी नसेल अशी प्रकरणे संबंधित प्रभाग अधिकाऱ्याच्या किंवा यथास्थिती मुख्याधिकाऱ्याच्या लेखी निदर्शनास आणावीत. प्रभाग अधिकाऱ्याने किंवा यथास्थिती मुख्याधिकाऱ्याने उपलब्ध अभिलेखांची तपासणी करुन जर ते समाधानकारक आढळले नाहीत तर नियमानुसार संबंधितांना नोटीस द्यावी व संबंधित व्यक्ती नोटीस कालावधीत आवश्यक कागदपत्रे सादर करु न शकल्यास त्या गुन्ह्याबाबत पुढील आवश्यक कारवाई (निष्कासन, एफ.आय.आर. दाखल करणे इ.) नियमानुसार करावी.

(ब) महानगरपालिकेत प्रभाग स्तरावर व नगरपालिकेत मुख्यालय स्तरावर बीटनिहाय नोंदवही ठेवण्यात यावी आणि बीट निरिक्षक/मुकादम यांनी या नोंदवहीमध्ये त्यांच्या बीटमधील अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम इ. नागरी गुन्ह्याशी संबंधीत घटनांची नोंद घ्यावी. तसे न केल्यास संबंधित बीट निरिक्षकास जबाबदार धरण्यात यावे. तसेच बीटमध्ये अतिक्रमण/अनधिकृत बांधकामाची एकही घटना निदर्शनास न आल्यास त्याचीही सुस्पष्ट नोंद बीट रजिस्टरमध्ये करण्याची जबाबदारी बीट निरिक्षक/बीट मुकादमाची राहील.

(क) बीट निरिक्षक व बीट मुकादम यांनी बीट नोंदवहीत नोंद केल्यानंतर संबंधीत घटनेची शहानिशा करण्यासाठी प्रभाग अधिकाऱ्यांनी किंवा यथास्थिती मुख्याधिकाऱ्यांनी एका अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. सदर अधिकाऱ्यांनी त्याचा अहवाल प्रभाग अधिकाऱ्यांना किंवा यथास्थिती मुख्याधिकाऱ्यांना अविलंब सादर करावा व प्रभाग अधिकारी/मुख्याधिकारी यांनी त्याआधारे नियमानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

(ड) महानगरपालिकांच्या बाबतीत प्रभाग स्तरावरील सहायक आयुक्त/प्रभाग अधिकारी यांच्या नियंत्रणाखालील पथकाने अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण निर्मूलनाबाबत प्रभाग स्तरावर करण्यात आलेल्या निष्कासन कारवाईचा दैनंदिन अहवाल अतिरिक्त/उपआयुक्त (मुख्यालय)(अनधिकृत बांधकाम विभाग) यांच्याकडे सादर करावा. अतिरिक्त/उपआयुक्त (मुख्यालय) यांनी शहरात करण्यात आलेल्या कारवाईचा दैनंदिन आढावा घेऊन तो आयुक्तांना सादर करावा.

(इ) नगरपरिषदांमधील अतिक्रमण निर्मूलन व अनधिकृत बांधकाम नियंत्रण पथकाने शहरातील अनधिकृत बांधकाम/अतिक्रमणासंदर्भात केलेल्या कारवाईचा दैनंदिन आढावा मुख्याधिकाऱ्यांनी घ्यावा.

३) अनधिकृत बांधकामावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलन पथक व महानगरपालिकेचा/नगरपालिकेचा नगररचना विभाग यांच्यात अधिक समन्वयाची आवश्यकता असल्याने त्याकरीता आयुक्तांनी/मुख्याधिकाऱ्यांनी आवश्यक उपाययोजना कराव्यात. एखाद्या नियोजन प्राधिकरणाच्या नगररचना विभागाने एखाद्या बांधकामास बांधकाम परवानगी दिल्यानंतर त्यांची माहिती क्षेत्रीय अधिकाऱ्यांना/बीट कर्मचाऱ्यांना त्वरीत देण्यात येईल, अशी व्यवस्था करण्यात येईल.

५

४) महानगरपालिका/नगरपालिका क्षेत्रात सुरु असलेली सर्व नविन बांधकामे मंजूर आराखड्यानुसारच होत आहेत किंवा कसे यांची पहाणी प्रभाग स्तरावरील किंवा यथास्थिती मुख्यालय स्तरावरील पथकाने नियमितरित्या करावी व मंजूर आराखड्याशिवाय बांधकाम सुरु असल्याचे आढळल्यास नियमानुसार कारवाई करावी.

५) आपापल्या कार्यक्षेत्रामध्ये निदर्शनास आलेल्या/आणण्यात आलेल्या अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम/अनधिकृत फेरीवाले/अनधिकृत जाहिरात फलक इत्यादी नागरी गुन्ह्यांबाबत विहित मुदतीत नोटीस न दिल्यास व पुढील कारवाई न केल्यास संबंधित अधिकाऱ्यास/कर्मचाऱ्यास व्यक्तिशः जबाबदार धरुन त्याच्या विरुद्ध कारवाई करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

६) प्रभाग अधिकाऱ्याने किंवा यथास्थिती मुख्याधिकाऱ्याने दिलेल्या नोटीशीस त्यांच्या सक्षम वरिष्ठ प्राधिकाऱ्यानी किंवा न्यायालयाने स्थगिती दिली नसल्यास विहित मुदतीनंतर नोटीशीप्रमाणे पुढील कारवाई निश्चितपणे करणे आवश्यक राहील. तसे न केल्यास संबंधितांना व्यक्तिशः जबाबदार धरुन त्याच्या विरुद्ध कारवाई करण्यात येईल, याचीही सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(मनु कुमार श्रीवास्तव)
सचिव (२), नगर विकास विभाग

प्रति,
१) मा.मुख्य सचिव,
२) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) आयुक्त, सर्व महानगरपालिका.
